बाल कामगार या अनिष्ट प्रथेतून
महाराष्ट्र राज्य मुक्त करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

शासन निर्णय क्रमांकः सीएलए-२००६/(२९९)/काम-७अ

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांकः २५ एप्रिल, २००६.

संदर्भः- १. याचिका क्र. ४६५/१९८६ मधील सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा.

२. जिल्हास्तरीय बाल कामगार सल्लागार मंडळाची स्थापनेसंदर्भातील शासन निर्णय क्र. सीएलए-१०९७/सीआर-३०७/काम-११, दि.१२.०२.१९९७.

३. दिनांक १८ मे २००५ रोजी स्थापन करण्यात आलेले कृती दल.

४. राज्य संसाधन कक्ष यशदाकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा शासन निर्णय क्र. सीएलए १०/२००५/(२०५)/कामगार-७अ, दि.२०.०४.२००६.

**प्रस्तावना :**

मुंबई येथे परराज्यातून लहान मुलांना कामाकरीता आणून अत्यल्प मोबदल्यात किंवा मोबदला न देता, काम शिकविण्याचे नांवाखाली सक्तीने बालमजूरी करवून घेत असल्याचे व त्याअन्वये बालमजुरांचा शारीरिक, मानसिक, आर्थिक छळ बेकायदेशीर उद्योगातून विशेषतः झोपडपट्टयांतून केला जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. बालमजुरांची मालकांच्या तावडीतून/छळातून मुक्तता करण्याच्या उद्देशाने, कामगार आयुक्तांच्या नियंत्रणाखाली, शासनाच्या संबंधीत विभागाचे (कामगार विभाग, गृह विभाग, महिला व बाल कल्याण विभाग इ.) अधिकारी आणि बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या दुकाने व आस्थापना विभाग यांचे अधिकारी तसेच स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी यांचे एकत्रित **कृती दल** दि.१८ मे, २००५ रोजी स्थापन करण्यांत आले. या कृती दलाने धाडसत्रे आयोजित करुन हजारो बालमजुरांची थेट सुटका यशस्वीरित्या केली व गृह विभागाच्या **जापू** (ज्यूवेनाईल एड पोलिस युनिट) मार्फत रेल्वेच्या सहकार्याने बालमजूरांना सुरक्षितरित्या त्यांचे मूळ गांवी पालकांच्या स्वाधीन केले. कृती दलाच्या या प्रशंसनीय कामकाजाची दखल संपूर्ण देशाने घेतली आहे. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी दि. १३ मार्च, २००६ च्या उन्हाळी अधिवेशनाच्या अभिभाषणात, बालमजूरी प्रथेचे उच्चाटन करणे अत्यावश्यक असल्याचा उल्लेख केलेला आहे. मुंबईच्या कृती दलाच्या धर्तीवर संपूर्ण महाराष्ट्र राज्यात, प्रत्येक जिल्हयात, संबंधित जिल्हादंडाधिका-यांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र कृती दलांची निर्मिती करणे, बालमजुरांची मालकांच्या जाचातून मुक्तता करणे, बालमजुरांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणणे, त्यांचे व आवश्यकतेप्रमाणे त्यांच्या कुटुंबीयांचे शक्यतोपरी पुनर्वसन करण्याबाबतचे अनेक प्रश्न शासनाच्या विचाराधीन होते. त्यासंदर्भात आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णयः-**

**१. (एक)** भारतीय संविधानाचा अनुच्छेद ३२ अंतर्गत, याचिका क्र.४६५/१९८६ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयातील निर्देशानुसार बालमजूरी ही अनिष्ट प्रथा आहे. त्याचे महाराष्ट्र राज्यातून समूळ उच्चाटन करुन बालमजुरांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात समाविष्ट करुन घेणे, त्यांचे व आवश्यकता असल्यास त्यांच्या कुटूंबियांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे.

**२. (दोन)** बालमजुरांची मालकाच्या छळातून त्वरीत मुक्तता करुन, त्यांचा प्राथमिक ताबा घेण्यात यावा. याकरिता, शासनाच्या संबंधीत सर्व विभागाच्या खालील अधिका-यांचे जिल्हानिहाय, जिल्हादंडाधिका-यांच्या थेट नियंत्रणाखाली **कृती दल** गठित करण्यांत येत आहे. या कृती दलात पुढील विभागांचे अधिकारी असतीलः-

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हादंडाधिकारी | कृती दल प्रमुख, |
| २. | जिल्हा पोलीस अधिक्षक | सदस्य |
| ३. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. | सदस्य |
| ४. | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी | सदस्य |
| ५. | जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जि.प. | सदस्य |
| ६. | जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. | सदस्य |
| ७. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य |
| ८. | महानगर पालिका आयुक्त (म.न.पा.) आहेत तेथे. | सदस्य |
| ९. | तसेच त्या त्या विभागातील कार्यरत बालकामगारांशी निगडीत, इच्छुक स्वयंसेवी संस्था | सदस्य |
| १०. | जिल्हयातील उप/सहाय्यक कामगार आयुक्त | सदस्य सचिव |

जिल्हादंडाधिका-यांनी कृतीदल सतत कार्यरत राहील व कृतीदलाची बैठक महिन्यातून किमान एकदा होईल हयाची दक्षता घ्यावी व आपला मासिक अहवाल विभागीय आयुक्त, प्रधान सचिव (महसूल), सचिव (मदत व पुनर्वसन), व प्रधान सचिव (कामगार) यांना पाठवावा.

**३. (तीन)** उपरोक्त विभागांची जबाबदारी पुढीलप्रमाणे राहीलः-

**अ) पोलीस विभागः** संबंधीत पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरिक्षक / ठाणे प्रमुख यांनी

१. कृती दलास धाडीकरितां मागणीनुसार तातडीने पुरेसा पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन द्यावा.

२. कृती दलाच्या धाडीत प्रत्यक्ष सहभागी व्हावे.

३. कृती दलाने मुक्त केलेल्या बालमजुरांचा ताबा घ्यावा.

४. बालमजुरांना कामावर ठेवणा-या प्रमुख मालकांविरुध्द अटकेची त्वरीत कारवाई करुन भारतीय दंड संहितेच्या कलम ३७४ व ३४ अंतर्गत तसेच किशोर न्याय (मुलांची देखरेख तथा संरक्षण) अधिनियम, २००० च्या कलम २३, २४ व २६ अंतर्गत गुन्हा दाखल करावा व पुढील कारवाई करावी.

५. मुक्त केलेल्या बालमजुरांना काळजीपूर्वक सन्मानाने वागवावे व त्यांना सुरक्षितरित्या बालगृहात महिला व बालविकास विभागाच्या अधिका-यांकडे सुपूर्द करावे.

६. कलम ३२ अंतर्गत बाल कल्याण समितीसमोर बालमजुरांची बाजू कृतीदलाच्या मदतीने मांडावी.

बाल कल्याण समितीच्या निर्णयानुसार बालमजूर परराज्यातील असल्यास **जापू** मार्फत त्यांची पालकांकडे सुरक्षित रवानगी करावी.

**ब) कामगार आयुक्त कार्यालयाचे अधिकारी :**

१. त्यांचे संबधित कार्यक्षेत्रात बालमजूर कार्यरत असण्याची शक्यता असणा-या विभागांवर सातत्याने सर्वेक्षणे करावीत.

२. बालमजूर कार्यरत असल्याचे आढळताच/ज्ञात होताच, बालकामगारांची संख्या जास्त असल्यास जिल्हादंडाधिकारी व पोलिस अधिकारी यांच्याशी समन्वय साधून २४ तासाच्या आंत कृतीदलाची धाड आयोजित करावी. बालमजुरांची संख्या कमी असल्यास सहका-यांच्या आणि पोलिसांच्या मदतीने त्याच दिवशी कारवाई करून बालमजूरांची मुक्तता करावी.

३. कृतीदलाचा कायमस्वरुपी सदस्य सचिव या नात्याने प्रत्येक धाडसत्राचे नियोजन करावे. धाडीत पुरेसे अधिकारी, दुकान निरीक्षक उपस्थित ठेवावेत. बालमजुरांची मुक्तता करण्यात सक्रिय सहभागी असावे. बालमजूर ठेवणा-या मालकांविरुध्द बाल कामगार अधिनियम १९८६ चे कलम ३ लागू असल्यास त्या अंतर्गत कारवाई करावी. उक्त अधिनियमाचे कलम ३ लागू नसलयास कलम ७,८,९,११,१२ आणि १३ अंतर्गत कारवाई करावी.

४. धोकादायक उद्योग नसला तरीही बालकामगार प्रथेच्या उच्चाटनार्थ अशा बालकामगारास शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने धाडसत्रादरम्यान मालकाच्या तावडीतून मुक्त करुन पोलिसांच्या स्वाधीन करावे.

५. मुक्त केलेल्या बालमजुरांचा सोबतच्या विहीत तक्ता अ मध्ये नमूद केलेला संपूर्ण तपशील बालमजुरांकडून आपुलकीने माहिती मिळवून भरावा व त्या तक्त्याची एक प्रत पोलिस विभागास द्यावी. बालमजूर आढळलेल्या मालकाविरुध्द पोलिसांकडे औपचारिकतेचा भाग व कर्तव्य म्हणून (कृती दलाच्या वतीने) रीतसर तक्रार/ जबाब नोंदवावा.

६. बालमजुरांकडून माहिती मिळविताना मालकाने सदर बालमजूर कामावर ठेवण्याकरिता बालमजुरांच्या पालकास कोणत्याही प्रकारे आर्थिक सहाय्य, कर्ज, उचल इ. स्वरुपात रक्कम

अदा केली आहे का, याबाबतदेखील माहिती घ्यावी आणि अशा उक्त स्वरुपात रक्कम अदा करण्यात आलेली असल्यास, त्यांना वेठबिगार कामगार म्हणून घोषित करण्याबाबत त्वरीत थेट अहवाल जिल्हाधिकारी यांना पुढील कारवाई प्रीत्यर्थ सादर करावा व त्याची प्रत कामगार आयुक्तांमार्फत शासनास पाठवावी.

७. धाडीत मुक्त केलेल्या बालकांना बालगृहात पाठवेपर्यंत त्यांची योग्य ती काळजी घ्यावी, जसे की, त्यांना वेळेवर जेवण मिळेल, पाणी मिळेल यासंदर्भातील व्यवस्थेवर नियंत्रण ठेवावे.

८. धाडसत्रात किशोर न्याय (मुलांची देखरेख तथा संरक्षण) अधिनियम, २००० च्या कलम २ (ट) नुसार ज्याने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली नाहीत, तो बालक अशी बालकाची व्याख्या केलेली असल्याने, १४ वर्षापुढील किशोरवयीन बालमजूर जर धाडसत्रात आढळले तर अशांना देखील मालकाचे तावडीतून मुक्त करुन पोलिसांचे स्वाधीन करावे.

९. ज्या मालकांविरुध्द बालकामगार अधिनियम १९८६ चे कलम ३ अंतर्गत कारवाई करण्यात आली, अशांकडून सर्वोच्च न्यायालयाच्या याचिका क्र. ४६५/१९८६ तील निवाडयानुसार रु. वीस हजार फक्त (रु. २०,०००/-) बालकल्याण फंडाकरिता वसूली कारवाई करावी.

१०. ज्या मालकांकडे बाल कामगार आढळले असतील अशांविरुध्द, लागू असल्यास
   १) मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियमाचे अंतर्गत,
   २) किमान वेतन अधिनियमाचे अंतर्गत,
   ३) मोटार परिवहन कामगार अधिनियमाचे अंतर्गत,
   ४) कारखाना अधिनियमाचे अंतर्गत असलेल्या संबंधीत तरतुदींचा बाल कामगारांच्या हितास्त वापर करण्याकरिता आवश्यक ती रीतसर न्यायालयीन अहवाल पुढील महिन्याच्या पहिल्या आठवडयात शासनास कामगार आयुक्तांमार्फत सादर करावा.

**क) महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी:**

१. बालमजूरी प्रथेविरुध्द जनजागृती करावी. स्थानिक बालकामगार असल्यास जिल्हादंडाधिकारी यांच्या आणि स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने अशा बालमजुरांचे पुनर्वसन करावे.

२. कृतीदलाने मुक्त केलेल्या बालकामगारांचा पोलिसांकडून रीतसर ताबा घेवून त्यांच्या अन्न, वस्त्र, निवा-याची, सुरक्षिततेची संपूर्ण काळजी घ्यावी.

३. स्थानिक बालमजूर असल्यास शिक्षण अधिका-यांच्या मदतीने त्यांना शिक्षणाच्या मूळ स्त्रोतात सहभागी करवून घ्यावे. त्याचबरोबर शक्य असल्यास, काळानुरूप व्यवसायाभिमूख तांत्रिक प्रशिक्षणही देण्यात यावे.

४. मुक्त केलेल्या बालमजुरांना बाल कल्याण समितीसमोर हजर ठेवावे व त्यांची बाजू मांडावी.

५. बाल कल्याण समितीचे आदेशांची दरमहा माहिती जिल्हादंडाधिकारी व कामगार आयुक्त यांना स्वतंत्रपणे सादर करावी.

**ड) शिक्षण अधिकारी :**

१. शालेय प्रवेशाकरिता लागणा-या दाखल्याकरिता आग्रही न राहता, सरळ शालेय प्रवेश देण्यात यावा आणि मुक्त केलेल्या बालमजूरांना भेदभाव (लिंगभेद/जातिभेद इ.) न करता, शिक्षणाच्या मूळ स्त्रोतात समाविष्ट करण्याच्या दृष्टीने प्राधान्याने त्या बालमजुरांना मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करुन द्यावे व ते घेण्यास भाग पाडावे.

२. त्याकरिता शासनाच्या व केंद्र शासनाच्या उपलब्ध सर्व विविध योजना राबवाव्यात.

३. शिक्षणाच्या वेळेत त्यांना मोफत आहाराच्या शासकीय योजनांचा लाभ प्रत्यक्ष मिळवून द्यावा.

४. बालमजूरांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण होईल याबाबत विशेष दक्षता घ्यावी.

५. बालमजुरांच्या शैक्षणिक गळतीस शिक्षण अधिकारी व शाळेचे मुख्याध्यापक जबाबदार राहतील.

६. शैक्षणिक प्रचारार्थ बालमजुरांच्या आई वडिलांचे समुपदेशन करुन शिक्षणाचे महत्व पटवून द्यावे.

७. शहरी भागात महानगर पालिका अधिकारी व ग्रामीण भागात जिल्हा परिषद अधिकारी यांनी उपरोक्त संबंधित बाबींवर पूर्ण नियंत्रण ठेवून सहकार्य करावे, आणि केलेल्या कामकाजाचा अहवाल जिल्हाधिका-यांना/ कामगार आयुक्तांना दरमहा सादर करावा.

**इ) शासकीय वैद्यकीय अधिकारी :**

१. कृतीदलाच्या धाडसत्रासंदर्भात कामगार अधिकारी/ पोलिस अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर मुक्त करण्यात आलेल्या बालमजुरांची संपूर्ण वैद्यकीय तपासणी करावी.

२. आवश्यकता असल्यास त्वरेने उपचार सुरु करावेत.

३. मुक्त केलेल्या बालमजुरांच्या निःसंदिग्ध वयाचे प्रमाणपत्र त्वरीत तपास पोलिस अधिकारी/ सरकारी कामगार अधिकारी यांना मागणीनुसार देण्यात यावीत.

४. बालमजूरांच्या वयासंदर्भातील प्रमाणपत्र, शासनाच्या साहाय्यक शल्य विशारद (असिस्टंट सर्जन) या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या वैद्यकीय अधिका-यांनी अदा करु नये.

५. उपचारार्थ आणि वैद्यकिय प्रमाणपत्रार्थ येणारा सर्व खर्च जिल्हादंडाधिका-यांनी जिल्हा बाल कल्याण निधीतून प्रथम भागवावा आणि तो खर्च बालमजुरास नियुक्त केलेल्या त्याच मालकाकडून वसूल करुन पुन्हा जिल्हा बाल कल्याण निधीत जमा करावा.

**फ) जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालयातील अधिकारी :**

१. बालमजुरांच्या प्रश्नांशी निगडीत असणा-या सर्व स्वयंसेवी संस्थांची त्यांच्या संक्षिप्त माहितीसह अद्यावत यादी बनवावी. अशा स्वयंसेवी संस्थांना विश्वासात घेवून त्यांच्यामार्फत जनजागृती

अभियान हाती घ्यावे. शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क व प्रगतीची पहिली पायरी आहे हे जनमत तयार करण्यास प्रयत्नशील रहावे.

२. जिल्हादंडाधिका-यांना बालमजुरांच्या धाडसत्राबाबत अवगत करुन द्यावे.

३. दर पंधरावडयास कृती दलाची आढावा बैठक जिल्हादंडाधिका-यांसमोर आयोजित करावी.

४. आढावा बैठकीचे इतिवृत्त तयार करुन कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत शासनास सादर करावे.

५. संबंधित जिल्हादंडाधिका-यांच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही प्रकारचे बालमजूर आढळणार नाहीत यादृष्टीने ठोस कार्यवाही करावी.

६. मुक्त करण्यात आलेल्या बालमजुराच्या पालकांना जर संबंधित मालकाने आगाऊ उचल कोणत्याही कारणास्तव, प्रत्यक्ष दिल्याचे तपासात आढळले असल्यास, अशा बालकामगारास वेठबिगार कामगार म्हणून समजण्यात यावे आणि त्यानुसार मालकाविरुध्द कारवाई करावी आणि अशा वेठबिगार बालमजुरास नियमानुसार शासकीय फायदे (रु.२०,०००/-) मिळवून देण्यांत यावेत.

७. बालमजूर नियुक्त केलेल्या मालकाविरुध्द कडक कायदेशीर कारवाई करुन अशा मालकांकडून प्रति बालमजूर रु.वीस हजार, जिल्हा बाल कल्याण निधीत जमा करुन त्यात शासनाचा हिस्सा रु.५,०००/- प्रति बाल मजूर जमा करावा. (सर्वोच्च न्यायालयाच्या याचिका क्र.४६५/१९८६ नुसार)

८. सदर निधीबाबत कामगार आयुक्तांमार्फत शासनास दि.३० सप्टेंबर पूर्वी आणि ३१ मार्च पूर्वी अर्धवार्षिक उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

९. जमा निधीच्या विनियोगार्थ आवश्यकतेप्रमाणे कामगार आयुक्तांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. सदर जमा निधीचा विनियोग शक्यतो त्याच बाल मजुरांच्या पुनर्वसनार्थ करण्यात यावा.

१०. उक्त उल्लेख केलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार बालमजुरांच्या ऐवजी त्यांच्या कुटुंबातील प्रौढ, बेरोजगार व्यक्तीस तेथे रोजगार उपलब्ध करुन द्यावा व त्या बालमजुरास शिक्षणाच्या मूळ प्रवाहात दाखल करावे.

११. बालमजुरीशी कौटुंबीक समस्या निगडीत असल्यास, अशा बालमजुराच्या संपूर्ण कुटूंबाचे जिल्हादंडाधिका-यांनी शासनाच्या विविध योजनांतर्गत कृतीसंगम (जुळणी) करुन पुनर्वसन करावे. त्यांना रोजगार, निवास, उत्पन्न उपलब्ध करुन द्यावे.

१२. ज्या अर्थी बाल कामगारास मजूरी करणे भाग पडते, त्याअर्थी तो गरीबातील गरीब कुटुंबातील आहे. म्हणून जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील लोकांकरिता असणा-या सर्व योजनांचा प्रथम प्राधान्याने लाभ बालकामगारास व त्याचे कुटुंबीयांस द्यावा.

१३. जिल्हयाची ग्रामीण व शहरी अशी विभागणी करावी. त्यानुसार कृती दलाची आखणी करुन सदर निर्णयाची अंमलबजावणी करवून घ्यावी. जनजागृती अभियान राबवावे.

१४. शासन निर्णय निर्गमीत झाल्यापासून एक आठवडयाच्या आत कृती दल गठित करुन हा निर्णय अवगत करवून तातडीने बालमजूरीविरुध्द धाडसत्रे आयोजित करावीत.

## तक्ता - अ

**बाल कामगारांच्या मुक्ततेसाठी कृती दलातर्फे टाकण्यात आलेल्या धाडींच्या वेळी घेण्यात आलेली मुलाखत.**

धाडीची तारीखः-
धाडीचे ठिकाणः-
निरीक्षकाचे नांवः-

साक्षीदार - १
साक्षीदार - २

| अ. क्र. | मालकाचे नाव व पत्ता दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्र. | एकूण बाल कामगार | १८ वर्षा खालील बाल कामगार | १४ वर्षा खालील बाल कामगार | बाल कामगाराचे नाव, वडिलांचे नाव, मूळ गावाचा पत्ता मोहल्ला (गल्ली) गाव / तालुका / जिल्हा / राज्य | अंदाजे वय | कामाचे स्वरुप | कामाची वेळ / सुट्टीची वेळ | आठवड्याची सुट्टी | मजुरी दिली जाते / जात नाही | मजुरी / वेतन मिळण्याची तारीख | सही / अंगठा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |

**४. (चार)** कृती दल गठित केल्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत कृती दलातील अधिका-यांना यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (यशदा) मार्फत प्रशिक्षित करवून घेण्यात यावे. बालमजूरी क्षेत्रासंदर्भातील शासनाच्या सुकाणू समितीचे निमंत्रक यशदा, पुणे ही संस्था कार्यरत असल्याने त्या संबधीचे संशोधन, मार्गदर्शन व प्रशिक्षण यशदा मार्फत केले जाईल.

**५. (पाच)** उक्त नमूद करण्यात आलेल्या अधिनियमांतर्गत एकत्रित अमलबजावणी करावयाची असल्याने, धोकादायक उद्योग व अधोकादायक उद्योग असा भेदभाव न करता सर्व जिल्हयातून, सर्व उद्योगातून, कोणत्याही प्रकारचे काम करणारे आणि शिक्षण न घेणारे बालमजूर कृती दलाच्या माध्यमातून मुक्त करुन त्यांना पुनर्वसित करुन शिक्षण देण्याच्या दृष्टीनेच सर्वोतोपरी प्रयत्न करावेत.

**६. (सहा)** यासंबंधीचा खर्च संबंधित विभागांनी, ज्या ज्या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली करणे उचित असेल, त्या त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो, त्या त्या शीर्षातर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

**७. (सात)** विभागीय आयुक्तांनी आपल्या विभागातील संबंधित कृतीदलावर नियंत्रण ठेवावे तसेच त्यांच्या कार्याचा दरमहा आढावा घेऊन शासनाच्या महसूल, मदत व पुनर्वसन तसेच कामगार विभागास दर महिन्याच्या २० तारखेला अहवाल पाठवावा.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

*सही/-*

(जे. पी. डांगे)

**शासनाचे प्रधान सचिव**